# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.६३१८/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.संजय कन्हैयालाल पाठक, रा.C/O, पाठक मोटर्स, यशवंत नगर, औंदाणे शिवार ताहाराबाद रोड, सटाणा, ता.बागलाण, जि.नाशिक. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे, ता.बागलाण, जि.नाशिक. | विस्तार अधिकारी(ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, बागलाण, ता.बागलाण, जि.नाशिक. |

**सुनावणी दिनांक — १२/०२/२०२५**

१. **उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

२. **द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २१/१०/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : लेखी स्वरुपात माहिती देण्याबाबत टाळाटाळ करणे, मुद्दाम व्यथित करणे, आज देतो, उद्या देतो, दहा दिवसांत देतो असे सांगण्यात आले.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

३. **माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २१/०६/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१/०६/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दहा दिवस फक्त.

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** औंदाणे ग्रामपंचायत हद्दीतील यशवंत नगर परीसरातील "पाठक मोटर्स" शोरुमच्या पश्चिमेकडील टाकण्यात आलेली पाईप लाईन बाबत खालील माहिती देण्यात यावी (लेखी स्वरुपात देण्यात यावी.) १)पाईपलाईन टाकणेबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव-त्याबद्दलची माहिती. २)जागामालकाचे/प्लॉट धारकाचे संमतीपत्र किंवा करारपत्र त्याबद्दलची माहिती. ३) पाईपलाईन साठी निधी राज्यशासनाने/जिल्हापरीषदेने किंवा कोणी दिला त्याबाबतचे मंजुरीपत्राची माहिती. ४)पाईप लाईन टाकण्याबाबत दैनिकात प्रकाशित केलेली जाहिरात पत्र.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रापंचायत कार्यालय, औंदाणे, ता.बागलाण, जि.नाशिक. यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २१/०७/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१/०७/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : लेखी स्वरुपात माहिती देण्याबाबत हलगर्जीपणा/टाळाटाळ करणे.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, बागलाण, ता.बागलाण, जि.नाशिक. यांनी कोणतीही

कार्यवाही केल्याचे दिसूनयेत नाही.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा** –

(१) **अपिलार्थी-** जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, सुनावणीस बोलावले नाही, प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही तसेच संबंधीतावर कायदेशीर कार्यवाही करावी तसेच माहिती मिळावी.

(२) **विद्यमान जन माहिती अधिकारी-** अपिलार्थी यांना दि.०२/११/२०२२ रोजी सदरची माहिती पोस्टाने पाठविली असता परत आली असल्याचे स्पट केले.

६. **निष्कर्ष** –

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२१/०६/२०२२ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

(२) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीवेळी आयोगाकडे सादर केलेले कागदपत्र या प्रकरणातील माहिती अर्जाशी संबंधीत नसुन अन्य माहिती अर्जाशी संबंधीत असल्याचे दिसून येते.

(३) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारित केल्याचे दिसून येत नाही.

(४) अपिलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे, ता.बागलाण, जि.नाशिक. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक-२१/०६/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे, ता.बागलाण, जि.नाशिक. यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक. यांना आदेशीत करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, बागलाण, ता.बागलाण, जि.नाशिक. यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत न करुन अधिनियमातील कलम १९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ) दि.१२/१२/२००७ मधील तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्याची खातरजमा झाल्यास त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.६३१८/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.

जावक क्र. ४८०११ 23 JUN 2025